**ठळक बातम्या**

- मार्च २०२६पर्यंत देशातून नक्षलवादाचा बीमोड होईल, आणि केंद्रीय राखीव पोलीस दलाची त्यात महत्त्वाची भूमिका असेल असं केंद्रीय गृहमंत्र्यांचं प्रतिपादन

- केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंग चौहान आज ब्राझीलमध्ये साओ पाउलो इथे १५व्या ब्रिक्स कृषी मंत्री बैठकीत सहभागी होणार

- चालू वर्षात भारताची अर्थव्यवस्था साडेसहा टक्के दरानं वाढणार असल्याचा युएनसीटीएडीचा अहवाल

- यंदाचा लता दीनानाथ मंगेशकर पुरस्कार प्रसिद्ध उद्योगपती कुमारमंगलम बिर्ला यांना जाहीर

**आणि**

- नेपाळमध्ये अवैधरित्या सोनं चांदीची विक्री करणाऱ्या ९ भारतीयांना काल काठमांडूमध्ये अटक

**<><><><><>**

पुढच्या वर्षी मार्चअखेरीपर्यंत देशातून नक्षलवादाचा बीमोड होईल, आणि केंद्रीय राखीव पोलीस दलाची त्यात महत्त्वाची भूमिका असेल असं केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी म्हटलं आहे. मध्यप्रदेशात नीमच इथं केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या ८६व्या स्थापनादिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. सीआरपीएफच्या कोब्रा बटालियनने नक्षलविरोधी मोहिमांमधे महत्वाची कामगिरी बजावली आहे असं ते म्हणाले. विविध मोहिमांमधे सीआरपीएफचे २ हजार २६४ जवान शहीद झाल्याचं सांगून त्यांनी शहीदांना आदरांजली वाहिली. विशेष कामगिरी

बजावणाऱ्या जवानांना केंद्रीय गृहमंत्र्यांच्या हस्ते शौर्य पुरस्कार देऊन गौरवण्यात आलं. अमित शाह यांनी शहीद स्थळावर पुष्पचक्र अर्पण केलं तसंच सीआरपीएफ दलाच्या संचलनाची मानवंदना स्वीकारली. मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव आणि सीआरपीएफचे महासंचालक ज्ञानेंद्र प्रताप सिंग कार्यक्रमाला उपस्थित होते.

**<><><><><>**

केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंग चौहान आज ब्राझीलमध्ये साओ पाउलो इथे १५व्या ब्रिक्स कृषी मंत्री बैठकीत सहभागी होणार आहेत. या बैठकीत ब्रिक्स देशांमधील सहकार्य, नवोन्मेष आणि व्यापारामार्फत शाश्वत कृषी तंत्राला प्रोत्साहन देण्याविषयी चर्चा होईल, असं कृषी मंत्रालयाने एका पत्रकात म्हटलं आहे. या दौऱ्यात कृषिमंत्री चौहान, ब्राझीलचे कृषीमंत्री कार्लोस फावेरो तसेच कृषिविकास आणि कुटुंबशेती मंत्री लुईझ टिकसेरा यांच्याशी द्विपक्षीय चर्चा करणार आहेत. ब्राझीलमधल्या कृषी संलग्न व्यापारात सहभागी कंपन्यांशीदेखील ते चर्चा करणार आहेत. तिथल्या भारतीय दूतावासात 'एक पेड मां के नाम' या उपक्रमाअंतर्गत ते वृक्षारोपण करणार असून साओ पाउलो इथल्या भारतीय समुदायाशीही ते संवाद साधणार आहेत.

**<><><><><>**

गेल्या आर्थिक वर्षात भारताची स्मार्टफोन्सची निर्यात विक्रमी पातळीवर पोहोचली आहे. केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी समाजमाध्यमावर ही माहिती दिली आहे. भारतातून सर्वात जास्त निर्यात होणाऱ्या पहिल्या १० उत्पादनांमधे आता स्मार्टफोनची गणना होत असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. उत्पादनावर आधारित प्रोत्साहन देण्याच्या सरकारच्या योजनेमुळे या क्षेत्रात रोजगार निर्मिती मोठ्याप्रमाणावर झाल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

जगभरात मंदीचं सावट असतानाही या वर्षात भारताची अर्थव्यवस्था मात्र साडेसहा टक्के दराने वाढणार असल्याचं संयुक्त राष्ट्रसंघाच्या व्यापार आणि विकास अहवालात म्हटलं आहे. विकासाला चालना देणारा खर्च आणि वित्तीय धोरणामुळे भारताच्या अर्थव्यवस्थेला मोठं पाठबळ मिळत असल्याचं या अहवालात म्हटलं आहे. याच काळात चीनची अर्थव्यवस्था ४ पूर्णांक ४ दशांश टक्के दराने वाढत असून अमेरिकेची आणि युरोपियन महासंघाची अर्थव्यवस्था १ टक्के दराने वाढत आहे. फ्रांस , जर्मनी आणि इटली च्या अर्थव्यवस्था एका टक्क्याहून कमी दराने वाढत असून जपानच्या वाढीचा दर अर्ध्या टक्क्या पर्यंत खाली येऊ शकतो, असं या अहवालात म्हटलं आहे.

**<><><><><>**

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी लादलेल्या वाढीव आयातशुल्कामुळे जगभरातील व्यापारात घट होईल, असा अंदाज जागतिक व्यापार संघटनेनं म्हणजे डब्ल्यूटीओनं व्यक्त केला आहे. या संघटनेनं २०२५ आणि २०२६ या वर्षांसाठीच्या व्यापाराचा अंदाज काल प्रसिद्ध केला. त्यात अमेरिका आणि चीनमधल्या व्यापार संघर्षाबाबत चिंता व्यक्त करण्यात आली आहे. डब्ल्यूटीओच्या महासंचालक नगोझी ओकोंजो-इविला यांनी याबाबत निवेदन प्रसिद्ध केलं आहे. अमेरिका आणि चीन यांच्यातला व्यापार ८१ टक्क्यांनी कमी होईल असं त्यांनी म्हटलं आहे. जगभरातील व्यापार २०२५मध्ये २ दशांश टक्क्यांनी कमी होईल असा अंदाज त्यांनी व्यक्त केला आहे.

**<><><><><>**

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी निवडणुकीपूर्वी महागाई कमी करण्याचं आश्वासन दिलं होतं, मात्र आता त्यांनी जाहीर केलेल्या करधोरणामुळे महागाई वाढणार असल्याचं अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्हचे अध्यक्ष जेरॉम पॉवेल यांनी म्हटलं

आहे. शिकागो इथल्या इकॉनॉमिक क्लब ने काल रात्री आयोजित केलेल्या एका कार्यक्रमात ते बोलत होते.

**<><><><><>**

दरम्यान, अमेरिकेतील कॅलिफोर्निया राज्य अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांच्यावर खटला दाखल करेल, असं कॅलिफोर्नियाचे गव्हर्नर गॅविन न्यूसोम यांनी जाहीर केलं आहे. ट्रंप यांनी विविध देशांवर वाढीव आयातशुल्क लादल्यामुळे कॅलिफोर्नियात भाववाढ होत असून बेरोजगारीचा धोका वाढत आहे, असं न्यूसोम यांनी समाजमाध्यमांवरच्या संदेशात म्हटलं आहे.

**<><><><><>**

यंदाचा लता दीनानाथ मंगेशकर पुरस्कार प्रसिद्ध उद्योगपती कुमारमंगलम बिर्ला यांना जाहीर झाला आहे. आदित्य बिर्ला समूहाचे अध्यक्ष पद्मविभूषण बिर्ला यांचं दूरदर्शी नेतृत्व आणि भारताच्या विकासगाथेत त्यांनी दिलेल्या योगदानासाठी हा सन्मान त्यांना प्रदान करण्यात येणार आहे. मास्टर दीनानाथ मंगेशकर यांच्या ८३ व्या स्मृतिदिनी मुंबईत येत्या २४ एप्रिलला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांच्या हस्ते पुरस्कार वितरण होईल. गुरु दीनानाथजींच्या समर्पण, उत्कृष्टता आणि सेवेच्या भावनेला मूर्त रूप देणाऱ्या व्यक्तींना दरवर्षी हा पुरस्कार दिला जातो. अभिनेत्री श्रद्धा कपूर, सोनाली कुलकर्णी, अभिनेते सुनील शेट्टी, सचिन पिळगावकर, शरद पोंक्षे, गायिका रिवा राठोड, साहित्यिक श्रीपाल सबनीस, व्हायोलिनवादक डॉ. एन. राजम यांनाही या कार्यक्रमात विविध पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत.

**<><><><><>**

लातूर जिल्ह्यात राष्ट्रीय पोषण पंधरवड्यानिमित्त विविध उपक्रम राबवण्यात येत आहेत. या पोषण पंधरवड्यांविषयी सांगताना जिल्हा महिला बाल विकास अधिकारी जावेद शेख म्हणाले...

**होल्ड – बाईट- जावेद शेख**

**<><><><><>**

केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्रालया अंतर्गत असलेल्या राष्ट्रीय हातमाग विकास प्रधिकरणानं उत्तर प्रदेशात नॉयडा इथं एका विशेष हातमाग प्रदर्शनाचं आयोजन केलं आहे. यामध्ये देशातल्या १३ राज्यांमधल्या कारागीरांनी हातमागावर विणलेली वस्त्रं विक्रीसाठी ठेवण्यात आली आहेत.

**<><><><><>**

सक्तवसुली संचालनालयानं अर्थात ईडीनं आज काँग्रेस नेत्या प्रियांका गांधी यांचे पती रॉबर्ट वाड्रा यांची सलग तिसऱ्या दिवशी चौकशी केली. हरियाणातल्या जमीन व्यवहारातल्या अनियमितते संदर्भात ही चौकशी सुरु असल्याचं ईडीने म्हटलं आहे. नवी दिल्लीतल्या ईडीच्या कार्यालयात ही चौकशी सुरु आहे.

**<><><><><>**

अमेरिकेचे उपाध्यक्ष जे. डी. व्हान्स येत्या २१ तारखेपासून भारताच्या चार दिवसांच्या दौऱ्यावर येत आहेत. व्हान्स यांचा हा पहिलाच भारत दौरा असल्याचं परराष्ट्र मंत्रालयानं म्हटलं आहे. या भेटीत व्हान्स २१ तारखेला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची भेट घेणार आहेत. व्हान्स जयपूर आणि आग्र्यालाही भेट देणार आहेत. या भेटीमुळे भारत-अमेरिका संबंधांमधील द्विपक्षीय संबंधांचा आढावा घेण्याची संधी मिळणार आहे.

**<><><><><>**

नेपाळमध्ये अवैधरित्या सोनं चांदीची विक्री करणाऱ्या ९ भारतीयांना काल काठमांडूमध्ये अटक करण्यात आली. हे सर्वजण महाराष्ट्रातले आहेत. त्यांच्याकडे दोन कोटी रुपयांपेक्षा अधिक किंमतीचं सोनं चांदी सापडली आहे. नेपाळ पोलिसांनी केलेल्या या कारवाईत ७ किलो सोनं आणि ८ किलो चांदी जप्त

करण्यात आली. या सोन्या चांदीची किंमत १ कोटी रुपये असून त्यांच्याकडून भारतीय आणि नेपाळी चलनही जप्त करण्यात आलं आहे.

<><><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत मुंबई इंडियन्सचा सामना आज सनरायर्जस हैदराबाद बरोबर होईल. मुंबईतल्या वानखेडे स्टेडियमवर संध्याकाळी साडे सात वाजता या सामन्याला सुरुवात होईल.

<><><><><>

राजस्थान आणि गुजरातमधल्या अनेक भागात उष्णतेची तीव्र लाट येण्याचा इशारा हवामान विभागाने दिला आहे.

//<><><><><>//